**स्त्रोत**

अंतरंगात
कवितेचं बीज
रूजायला लागल्यापासून
भेटत राहीला तो तिला
वयाच्या वळणांवर
वेगवेगळ्या रूपांत!
त्याच्या बोटांचा पुसटसा स्पर्श
रोमांचित करत गेला
तिच्या शब्दांना,
त्याच्या भेटीची आस
नवी ओढ देत गेला
तिच्या शब्दांना,
त्याचा आश्वस्त खांदा
भक्कम आधार देत गेला
तिच्या शब्दांना,
त्याचा विरह
विकल करत गेला
तिच्या शब्दांना...
मग
पुढचे वळण
आणि
पुढचा तो!
मोद, क्लेश,
शांती, त्वेष,
बोच, फुंकर,
जवळीक, अंतर,
माया, द्‌वेष,
विसर्ग, उन्मेष,
स्वार्थ, तर्पण,

स्वत्व, समर्पण,
वगैरै, वगैरे,
भावनिक मुलामे
देत गेला
तिच्या शब्दांना..
ती
बहरत राहीली,
झुरत राहीली,
झरत राहीली,
तिच्या शब्दातून,
आणि तो
पुढच्या रूपांत
भेटतच गेला तिला
एकेका कवितेचा
स्त्रोत बनून!!

**©प्रीती देशपांडे**